माऊली विद्यापीठ संचलित,

# महिला कला महाविद्यालय,बीड

शैक्षणिक वर्ष : 2023-2024

## इतिहास विभाग

## *"वार्षिक उपक्रम नियोजन"*

| अ.क्र. | दिनांक व महिना वर्ष | उपक्रम नियोजन व निमित्त |
|---|---|---|
| 1) | 17 सप्टेंबर 2023 | हैद्राबाद मुक्ती संग्राम दिनानिमित्त बीड जिल्ह्यातील क्रांतीकारकांचे हैद्राबाद मुक्ती संग्रामातील योगदान या विषयावर जेष्ठ स्वातंत्र्य सैनिकाचे मनोगत |
| 2) | 02 ऑक्टोबर 2023 | राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त - 'महात्मा गांधी यांचे विचार आणि कार्य' या विषयावर जेष्ठ इतिहास तज्ञाचे व्याख्यान आयोजित करण्यात येईल. |
| 3) | 12 जानेवारी 2024 | आई जिजाऊ जयंतीनिमित्त - 'आई जिजाऊची स्वराज्य प्राशसनातील भूमिका' या विषयावर राज्यस्तरीय वेबीनारचे आयोजन करण्यात येईल. |
| 4) | 19 फेब्रुवारी 2024 | विश्ववंदय शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त "शिवचरित्र" या विषयावर ऑनलाईन राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धात्मक परीक्षा 2024 चे आयोजन करण्यात येईल. |
| 5) | 19 फेब्रुवारी 2024 | शिवजयंतीनिमित्त "शिवचरित्रातून काय शिकावे" या विषयावर राज्यस्तरीय वेबीनारचे आयोजन करण्यात येईल. |
| 6) | 21 फेब्रुवारी 2024 | भव्य शिवकालीन शस्त्रप्रदर्शन पाहणे |

माऊली विद्यापीठ संचलित,

# महिला कला महाविद्यालय,बीड

शैक्षणिक वर्ष : 2023-2024

## इतिहास विभाग

## *-राज्यस्तरीय वेबीनार-*

**दि.13/01/2024 ठिक 1.00 वा.**

## *-: वेबीनारचा विषय :-*

**आई जिजाऊची स्वराज्य प्रशासनातील भूमिका**

## : <u>अहवाल</u> :

माऊली विद्यापीठ संचलित महिला कला महाविद्यालय,बीड आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिजाऊ जयंती निमित्त "आई जिजाऊची स्वराज्य प्रशासनातील भूमिका" या विषयावर दि.13/01/2024 रोजी राज्यस्तरीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या मा.प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर या होत्या. प्रमुख मार्गदर्शक डॉ.कामाजी डक (पोस्ट डॉक्टरल फेलो) इतिहास आणि प्राचीन भारतीय संस्कृती विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या यांच्या प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर यांनी केले महाविद्यालयामध्ये विविध विभाग आणि समितीव्दारा महाविद्यालयात आणि समाजस्तरावर घेण्यात येणारे उपक्रम यांची माहिती दिली. तसेच इतिहास विभागव्दारा घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. जिजाऊ जयंतीनिमित्त, "आई जिजाऊची स्वरा प्रशासनातील भूमिका" या विषयावर वेबीनार आयोजनाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. त्याचबरोबर जिजाऊच्या जीवन-कार्यावर सोदाहरण माहिती देऊन मांडणी केली.

पाहुणे परिचय इतिहास विभाग प्रमुख डॉ.मोहन काळकुटे यांनी करुन दिला. मा.कामाजी डक यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी विविध समित्यावर केलेल्या कार्याची माहिती दिली. तसेच त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान याविषयी माहिती दिली.

वेबीनार प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रमुख मार्गदर्शक मा.डॉ.कामाजी डक यांनी सर्वप्रथम जिजाऊंची प्रशासनातील भूमिका, तसेच जिजाऊ आणि शहाजीराजे समजल्याशिवाय स्वराज्य समजणार नाही. यानंतर दख्यनच्या राजकारणातील घटना भातवडीची लढाई या विषयी सविस्तर मांडणी केली. शहाजीराजेनी गनिमिकाव्याचा वापर भातवडीच्या लढाईत केला. त्याचबरोबर जिजाऊची शहाजीराजेसाठी असणारी युध्द नितीची आणि मार्गदर्शनाची भूमिका यांची सोदाहरण मांडली केली. शहाजीराजांना कर्नाटकची जहागिरी दिली. या मागील पार्श्वभूमी सांगून सविस्तर माहिती दिली. जिजाऊ मॉसाहेबांची महत्वपूर्ण भूमिका यांची माहिती असणारी समकालीन ऐतिहासिक साधने यांची माहिती दिली. पुण्याच्या जहागिरीत शिवाजी महाराज आणि जिजाऊंना शहाजीराजानी पाठवले. या ठिकाणी जिजाऊंनी शिवरायांना दिलेली तंत्रनिती शिकवन याविषयी माहिती देत असतांनाच शिवाजीराजांना जिजाऊंची युध्दनिती राजनिती आणि वेगनिती याची शिकवून कशी दिली हे सांगितले. शिवाजीमहाराजाच्या कार्य आणि कर्तृत्वामध्ये जिजाऊंचे मार्गदर्शन अत्यंत महत्वाचे आहे. अफजलखान भेटीच्या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांना जिजाऊंनी दिलेले पाठबळ यावरुन राजकारण आणि पुत्रप्रेम यापुढे जाऊन जिजाऊंची असलेली भूमिका स्पष्ट होते. जिजाऊ किती धुर्त आणि पराक्रमी होत्या हे समकालीन साधनातून लक्षात येते. शिवाजी महाराजाच्या मोहिमेमध्ये सल्ला मसलत करण्याचे काम जिजाऊनी केले. तसेच जिजाऊंनी केलेले न्याय निवाडे या विषयी माहिती दिली. स्वराज्य शिवाजी महाराजांनी निर्माण केले असले तरी स्वराज्याच्या पाया भरणीत जिजाऊ आणि शहाजी राजांचे योगदान या विषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आणि आभार मराठी विभागप्रमुख डॉ.रविंद्र ढास यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व कर्मचारी विद्यार्थीनी विविध शाळा, महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक, विद्यार्थी, संस्था संघटनेचे कार्यकर्ते, प्रतिष्ठीत नागरीक, महिला यांची बहुसंख्येने उपस्थित होती.

माऊली विद्यापीठ संचलित,

# महिला कला महाविद्यालय,बीड

शैक्षणिक वर्ष : 2023-2024

## इतिहास विभाग

## विश्ववंद्य शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'शिवचरित्र' या विषयावर ऑनलाईन राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धात्मक परीक्षा - 2024

## -: <u>अहवाल</u> :-

माऊली विद्यापीठ संचलित महिला कला महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने दि.18/02/2024 रोजी विश्ववंद्य शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'शिवचरित्र' या विषयावर ऑनलाईन राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धात्मक परीक्षा 2024 चे आयोजन करण्यात आले. सदरील परीक्षा 40 गुणांची व 20 प्रश्नाची होती.

सदरील स्पर्धात्मक परीक्षेत शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक तसेच सामाजिक क्षेत्रातील समाजसेवक, इतिहासाचे अभ्यास, शिवप्रेमी इ.मिळवून 103 स्पर्धक सहभागी झाले होते.

सदरील परीक्षेचा निकाल दि.23/02/2024 रोजी जाहिर (घोषित) करण्यात आला. या स्पर्धात्मक परीक्षेत प्रथम क्रमांक खालील विद्यार्थी-विद्यार्थीनी, इतिहासाचे अभ्यास, शिवप्रेमी यांना मिळाला.

1) गवते कावेरी महादेव
2) वारकूल धनजंय भाऊसाहेब
3) डॉ.अनंत नामदेवराव शिंदे
4) सावंत व्यंकटेश सुरेश
5) रोकडे विशाल आर.
6) पंडित टाकरास

7) गवते गौरव विकास

8) गिरी वैष्णवी नंदकिशोर

9) राऊत स्वराज्य

10) भिसे अनुष्का गहिनीनाथ यांना मिळाला

**तर व्दितीय क्रमांक**

1) ताटे ओमराज राम

2) नागरे गौरव केशव

3) डॉ.प्रदिप कुमार त्रिपाठी

4) गवळी सुराज मुरलीधर

5) प्रा.डॉ.मुजावर एस.टी.

6) घुमरे अमृता किरण

7) कलाणे पुजा कांतराव

8) कुटे कोमल वसंत

9) गवते रोशणी विकास

यांना मिळाला.

या स्पर्धेत प्रथम व व्दितीय क्रमांक ज्यांना मिळाला त्यांचे मा.प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर यांनी अभिनंदन केले व तसेच या स्पर्धेत सहभागी झालेल्याना प्रोत्साहन देवून अभिनंदन केले.

तसेच महाविद्यालय सर्व सहाय्यक प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व स्पर्धकांचे प्रोत्साहन देवून अभिनंदन केले.

माऊली विद्यापीठ संचलित,

# महिला कला महाविद्यालय,बीड

शैक्षणिक वर्ष : 2023-2024

## इतिहास विभाग

## *-राज्यस्तरीय वेबीनार-*

### विषय : "शिवचरित्रातून काय शिकावे"

## -: अहवाल :-

माऊली विद्यापीठ संचलित महिला कला महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त इतिहास विभागव्दारा दिनांक 21 फेब्रुवारी 2024 रोजी 'शिवचरित्रातून काय शिकावे' या विषयावर वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते.

वेबीनार प्रसंगी अध्यक्षस्थानी मा.प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर या होत्या तर प्रमुख मार्गदर्शक मा.डॉ.नितीन बावळे इतिहास विभाग प्रमुख, शारदा महाविद्यालय परभणी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक मा.प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर यांनी केले. शिवचरित्र प्रेरणा देणारा दिपस्तंभ आहे. शिवाजी महाराजानी रयतेचे स्वराजय निर्माण केले. शिवाजी महाराजांना अनेक भाषा अवगत होत्या ते बहुभाषिक होते. तसेच शिवाजी महाराज स्त्रीयांचा आदर करणारे व्यक्तीमत्व होते. शिवाजी महाराज केवळ महाराष्ट्र आणि देशातच नव्हे तर विश्वाचे राजे म्हणून ओळखले जातात. याविशयी सविस्तर मांडणी करुन वेबीनार आयोजनाचा मुख्य हेतू प्रास्ताविकातूनच स्पष्ट केला.

प्रमुख मार्गदर्शक मा.नितीन बावळे मा.नितीन बावळे यांनी मार्गदर्शन करतांना सर्वप्रथम शिवाजी महाराज यांचे जीवन आणि कार्य यावर मांडणी केली. देशाचे प्रशासन कार्यकारी मंडळावर चालत असते. छत्रपती शिवाजी महाराजाच्या कार्यात नेतृत्वात आणि गुणात काय आहे याविषयी मांडणी केली. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य आज प्रेरणादायी ठरत आहे. तसेच परकीय आक्रमण आणि त्याचे परिणाम याची उकल केली. मुस्लीम

आक्रमणाचे परिणाम समाजाला कसे भोगावे लागले या विषयी माहिती दिली याचबरोबर अनेक घराण्यांनी शहाजीराजे यांना विरोध करायला सुरुवात केली त्याचे परिणाम रयतेवरही झाले. शिवाजी महाराजांच्या जन्मापासूनच जिजाऊंनी आपल्या पतीचे जे हाल झाले ते शिवाजी महाराजांचे होवू नयेत म्हणून त्यांनी बालपणापासूनच तशी घडण केली. संस्काराचे धडे दिले ते आपल्याला महाराजांच्या कार्यातूनच दिसून येते. बालवयात त्यांनी स्वराज्याचे धडे गिरवले संवगडयामध्येही त्यांची रुजवण केली. तसेच रायरेश्वराच्या मंदिरात घेतलेली स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा या विषयी माहिती दिली. रयतेवर होणारे अन्याय, अत्याचार दूर करुन स्वराज्य निर्माण करायचे आहे. यासाठी ते सतत प्रयत्न करत असत. शिवाजी महाराजांच्या जीवनातील ठराविक प्रसंग सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज पराक्रमी होते. शिवाजी महाराजांनी रयतेचे स्वराज्य निर्माण केले. यांची सोदाहरण आणि सविस्तर मांडणी केली. याचबरोबर अफजलखान वध यासाठी वापरलेली युक्ती, याप्रसंगी घेतलेली काळजी याविषयी माहिती दिली. शिवाजी महाराजांसाठी कशाचीही पर्वा न करता निर्भिडपणे खंबीरपणे महाराजाच्या पाठीशी उभे राहण्याची रयतेची मानसिकता आणि शत्रूशी लढण्याची वृत्ती याची सोदाहरण उकल केली.

शाहिस्तेखानाची फजिती कशी केली, कसा हल्ला केला यांची माहिती दिली. सुरतेची लुट या विषयी मांडणी करतांना हल्ला कसा केला आणि कशी लूट केली हे सांगितले. त्याचबरोबर शिवाजी महाराजांची आग्रा भेट प्रसंग सांगत असतांना त्यांना तेथे मिळालेली वागणूक त्यांना झालेली कैद शिवाजी महाराजांना बाल संभाजीची वाटणारी काळजी आणि त्यातून त्यांनी कशी सुटका करुन घेतली व मोगल साम्राज्याला कशी चपराक दिली हे सांगितले.

तसेच शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य आणि जिंकलेले किल्ले याविषयी सवितसर आणि सोदाहरण मांडणी केली. शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक सोहळा कसा पार पडला हे सांगितले. राजमुद्रा कशी प्रेरणादायी आहे याची उकल केली. शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने मावळे आत्मबलिदान करण्यास पुढे येत होते. तानाजी मालुसरे शिवा काशीद, बाजीप्रभू देशपांडे, येसाजी कंक यांनी स्वराज्यासाठी केलेले कार्य अतुलनीय धाडसी, अनमोल आणि उल्लेखनीय आहे. तरुणांनाही पुढे घालणारे शिवाजी महाराजांचे चरित्र आहे. तत्कालिन सत्ताधिशांच्या विरोधात स्वराज्य निर्माण केले. रयतेवर स्त्रीयावर होणारे अत्याचार याविषयी

त्यांचे कार्य लक्षात घेतले पाहिजे.  थोडक्यात शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य पुढील सर्व काळासाठी प्रेरणादायी आहे.

शिवाजी महाराजाच्या गनिमी कावा आणि मोहिमा यांची मांडणी केली. शिवाजी महाराजांनी सर्व ठिकाणी आखलेल्या ज्या योजना आहेत.  ज्या पध्दतीने संकटांचा सामना केला आहे.   तो नक्कीच विद्यार्थी आणि सर्व सामान्य यासाठी प्रेरणादायी ठरावा असाच आहे. याविषयीमार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आणि आभार डॉ.वर्षा कुलकर्णी यांनी केले.  कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थिनी व इतर महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विविध क्षेत्रातील कर्मचारी, नागरीक यांची मोठया संख्येने उपस्थित होती.

माऊली विद्यापीठ संचलित,

# महिला कला महाविद्यालय,बीड

शैक्षणिक वर्ष : 2023-2024

## इतिहास विभाग

## भव्य शिवकालीन शस्त्रप्रदर्शन

## -: अहवाल :-

माऊली विद्यापीठ संचलित महिला कला महाविद्यालय बीड येथील इतिहास विभागाच्या वतीने 'शिवप्रेमी शिव जन्मोत्सव समिती,बीड' आयोजित भव्य शिवकालीन शस्त्र प्रदर्शन पाहण्यासाठी दि.21/02/2024 रोजी ठिक 1.00 ते 2.00 या वेळेत महाविद्यालयातील विद्यार्थीनीना आशिर्वाद मंगल कार्यालय बार्शी रोड बीड येथे घेवून जाण्यात आले.

महाविद्यालयातील विद्यार्थीनीनी दि.21/02/2024 ठिक 10.00 ते 2.00 या वेळेत भव्य शस्त्र प्रदर्शन पाहिले. त्या ठिकाणी विद्यार्थीनीना शिवकालीन शस्त्र कशी होती? त्या शस्त्राचा वापर मावळे कसा करीत. या संबंधीची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थीनींना संयोजन समितीकडून देण्यात आली.

या भव्य शस्त्र प्रदर्शनात शिवकालीन वेगवेगळ्या तलवारी, भाले, बिचवा, ढाली. इत्यादी शस्त्रे महाविद्यालयातील विद्यार्थीनी अगदी जवळून पाहिली.

ही सर्व शिवकालीन शस्त्रे पाहून विद्यार्थीनीनी आपण शिवकाळात गेल्यासारखे वाटले अशा विद्यार्थीनीच्या प्रतिक्रिया होत्या.

माऊली विद्यापीठ संचलित,

# महिला कला महाविद्यालय,बीड


## शैक्षणिक वर्ष : 2023-2024

## इतिहास विभाग

## *"न झालेल्या उपक्रमाची यादी"*

| अ. क्र. | दिनांक व महिना वर्ष | उपक्रम नियोजन व निमित्त | न झालेल्याचे कारण |
|---|---|---|---|
| 1) | 17 सप्टेंबर 2022 | हैद्राबाद मुक्ती संग्राम दिनानिमित्त बीड जिल्ह्यातील क्रांतीकारकांचे हैद्राबाद मुक्ती संग्रामातील योगदान या विषयावर जेष्ठ स्वातंत्र्य सैनिकाचे मनोगत | जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक उपलब्ध न झाल्यामुळे कार्यक्रम होवू शकला नाही. |
| 2) | 02 ऑक्टोबर 2023 | राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त "महात्मा गांधी यांचे विचार आणि कार्य" या विषयावर जेष्ठ इतिहास तज्ञांचे व्याख्यान आयोजित करण्यात येईल. | जेष्ठ इतिहास तज्ञ वेळेवर उपलब्ध होवू शकले नाही. |

## शिवकालीन शस्त्र प्रदर्शन भेट




शिवकालीन शस्त्र प्रदर्शन भेट प्रसंगीचे छायाचित्र




शिवकालीन शस्त्र प्रदर्शन भेट प्रसंगीचे शस्त्राची पाहणी व माहिती घेताना महाविद्यालयातील विद्यार्थीनी व डाॅ. मोहन काळकुटे




शिवकालीन शस्त्र प्रदर्शन भेट प्रसंगीचे उपस्थित महाविद्यालयातील विद्यार्थीनी व प्राध्यापक

जिजाऊ जयंती निमित्त ऑनलाईन राज्यस्तरीय वेबीनार






# बातमी

बीडरिपोर्टर पान ५

बीड । महाराष्ट्र । सोमवार, दि. १५ जानेवारी २०२४

## आई जिजाऊ ची स्वराज्य प्रशासनातील भूमिका या विषयावर राज्यस्तरीय वेबिनार संपन्न

बीड (रिपार्टर) माऊली विद्यापीठ संचलित, महिला कला महाविद्यालय बीड आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिजाऊ जयंती निमित्त आई जिजाऊची स्वराज्य प्रशासनातील भूमिका या विषयावर राज्यस्तरीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर होत्या. प्रमुख मार्गदर्शक डॉ. कामाजी डक (पोस्ट डॉक्टरल फेलो) इतिहास आणि प्राचीन भारतीय संस्कृती विभाग डा. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांनी केले. महाविद्यालयामध्ये विविध विभाग आणि समितीद्वारा महाविद्यालय आणि समाज स्तरावर घेण्यात येणारे उपक्रम याची माहिती दिली तसेच इतिहास विभागाद्वारा घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. जिजाऊ जयंती निमित्त आई जिजाऊ ची स्वराज्य प्रशासनातील भूमिका या विषयावर वेबिनार आयोजनाची पार्श्वभूमी स्पष्ट केली त्याचबरोबर जिजाऊंच्या जीवन कार्यावर सोदाहरण माहिती देऊन मांडणी केली. पाहुणे परिचय इतिहास विभाग प्रमुख डॉ. मोहन काळकुटे यांनी करून दिला मा. कामाजी डक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी विविध समित्यावर केलेल्या कार्याची माहिती दिली तसेच त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान याविषयी माहिती दिली. वेबीनार प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख मार्गदर्शक मा. कामाजी डक यांनी सर्वप्रथम जिजाऊंची प्रशासनातील भूमिका तसेच जिजाऊ आणि शहाजीराजे समजल्याशिवाय स्वराज्य समजणार नाही. यानंतर दख्खनच्या राजकारणातील घटना, भातवडीची लढाई याविषयी सविस्तर मांडणी केली. शहाजीराजांनी गनिमी काव्याचा वापर भातवळीच्या लढाईत केला याचबरोबर जिजाऊंची शहाजीराजांसाठी असणारी युद्धनीतीची आणि मार्गदर्शनाची भूमिका याची सोदाहरण मांडणी केली. शहाजीराजांना कर्नाटकची जहागिरी दिली या मागील पार्श्वभूमी सांगून सविस्तर माहिती दिली. जिजाऊ मॉं साहेबांची महत्त्वपूर्ण भूमिका याची माहिती असणारी समकालीन ऐतिहासिक साधने याची माहिती दिली. पुण्याच्या जहागिरीत शिवाजी महाराज आणि जिजाऊंना शहाजीराजांनी पाठवले या ठिकाणी जिजाऊंनी शिवरायांना दिलेली शिकवण याविषयी माहिती देत असतानाच शिवाजीराजांना जिजाऊंनी युद्धनीत्ती, राजनीती आणि तंत्रनीती याची शिकवण कशी दिली हे सांगितले. शिवाजी महाराजांच्या कार्य आणि कर्तुत्वामध्ये जिजाऊंचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे. अफजल खान भेटीचा प्रसंग छत्रपती शिवाजी महाराजांना जिजाऊंनी दिलेले पाठबळ यावरून राजकारण आणि पुत्र प्रेम यापुढे जाऊन जिजाऊंची असलेली भूमिका स्पष्ट होते. जिजाऊ कीती धूर्त आणि पराक्रमी होत्या हे समकालीन साधनातून लक्षात येते. शिवाजी महाराजांच्या मोहिमेमध्ये सल्ला मसलत करण्याचे काम जिजाऊंनी केले तसेच जिजाऊंनी केलेले न्याय निवाडे याविषयी माहिती दिली. स्वराज्य शिवाजी महाराजांनी निर्माण केले असले तरी स्वराज्याच्या पायाभरणीत जिजाऊ आणि शहाजीराजांचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले.

# शिवजयंती निमित्त आयोजित ऑनलाईन राज्यस्तरीय वेबीनार







**शिवजयंती निमित्त आयोजित ऑनलाईन राज्यस्तरीय वेबीनार प्रसंगीचे छायाचित्र**

# बातमी

पार्श्वभूमी    रविवार दि. २५ फेब्रुवारी २०२४

५

## शिवचरित्र म्हणजे प्रेरणा देणारा दीपस्तंभ
## प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांचे उद्‌गार

बीड दि २४(प्रतिनिधी) – शिवाजी महाराजांनी रयतेचे स्वराज्य निर्माण केले. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. ते बहुभाषिक होते तसेच शिवाजी महाराज स्त्रियांचा आदर करणारे व्यक्तिमत्त्व होते. शिवाजी महाराज केवळ महाराष्ट्र आणि देशातच नव्हे तर विश्वाचे राजे म्हणून ओळखले जातात. त्यांचे शिवचरित्र हे प्रेरणा देणारे दीपस्तंभ असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ संध्या अयस्कर यांनी केले. येथील महिला कला महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त इतिहास विभागाद्वारा शिवचरित्रातून काय शिकावे या विषयावर वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते वेबीनार प्रसंगी अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर या बोलत होत्या यावेळी. प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक नितीन बावळे इतिहास विभाग प्रमुख, शारदा महाविद्यालय परभणी यांची उपस्थिती होती. प्रमुख मार्गदर्शन नितीन बावळे यांनी मार्गदर्शन करताना सर्वप्रथम शिवाजी महाराज यांचे जीवन आणि कार्य यावर मांडणी केली. देशाचे प्रशासन कार्यकारी मंडळावर चालत असते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यात नेतृत्वात आणि गुणात काय आहे याविषयी मांडणी केली. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य आज प्रेरणादायी ठरत आहे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डॉ. वर्षा कुलकर्णी यांनी केले.

---

चंपावतीपत्र    epaper.champavateepatra.in

बीड-(महाराष्ट्र)    वार - सोमवार दि. २६ -०२-२०२४    २

## महिला कला महाविद्यालयात शिवचरित्रातून काय शिकावे या विषयावर वेबीनार संपन्न
## शिवचरित्र प्रेरणा देणारा दीपस्तंभ - मा. प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर

बीड । प्रतिनिधी

माऊली विद्यापीठसंचलित, महिला कला महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त इतिहास विभागाद्वारा दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी "शिवचरित्रातून काय शिकावे" या विषयावर वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते वेबीनार प्रसंगी अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर या होत्या तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक मा. नितीन बावळे इतिहास विभाग प्रमुख, शारदा महाविद्यालय परभणी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांनी केले. शिवचरित्र प्रेरणा देणारा दीपस्तंभ आहे. शिवाजी महाराजांनी रयतेचे स्वराज्य निर्माण केले. शिवाजी महाराजांना अनेक भाषा अवगत होत्या. ते बहुभाषिक होते तसेच शिवाजी महाराज स्त्रियांचा आदर करणारे व्यक्तिमत्त्व होते. शिवाजी महाराज केवळ महाराष्ट्र आणि देशातच नव्हे तर विश्वाचे राजे म्हणून ओळखले



जातात याविषयी सविस्तर मांडणी करून वेबीनारचा आयोजनाचा मुख्य हेतू प्रास्ताविकातून स्पष्ट केला. प्रमुख पाहुणे यांचा परिचय इतिहास विभाग प्रमुख डॉ. मोहन काळकुटे यांनी करून दिला. मा. नितीन बावळे यांच्या एकूण कार्यावर प्रकाश टाकला. प्रमुख मार्गदर्शन मा. नितीन बावळे यांनी मार्गदर्शन करताना सर्वप्रथम शिवाजी महाराज यांचे जीवन आणि कार्य यावर मांडणी केली. देशाचे प्रशासन कार्यकारी मंडळावर चालत असते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यात नेतृत्वात आणि गुणात काय आहे याविषयी मांडणी केली. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य आज प्रेरणादायी ठरत आहे तसेच परकीय आक्रमण आणि त्यांचे परिणाम याची उकल केली. मुघलांचे आक्रमणाचे परिणाम समाजाला कसे भोगावे लागले याविषयी माहिती दिली. याचबरोबर अनेक घराण्यांनी शहाजीराजे यांना विरोध करायला सुरुवात केली त्याचे परिणाम रयतेवरही झाले. शिवाजी महाराजांच्या जन्मापासूनच जिजाऊंनी आपल्या पतीचे जे हाल झाले ते शिवाजी महाराजांचे होऊ नयेत म्हणून त्यांनी बालपणापासूनच कशी घडण केली संस्काराचे धडे दिले ते आपल्याला महाराजांच्या कार्यातून दिसून येते. बाल वयातच त्यांनी स्वराज्याचे धडे गिरवले आणि आपल्या सवंगडीमध्येही त्याची रुजवन केली तसेच रायरेश्वराच्या मंदिरात घेतलेली स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा याविषयी माहिती दिली. रयतेवर होणारे अन्याय अत्याचार दूर करून स्वराज्य निर्माण करावयाचे आहे यासाठी ते सतत प्रयत्न करत असत. शिवाजी महाराज पराक्रमी होते. शिवाजी महाराजांनी रयतेचे स्वराज्य निर्माण केले याचे सोदाहरण आणि सविस्तर मांडणी केली. त्याचबरोबर अफजल खान व यासाठी वापरलेली युक्ती याप्रसंगी घेतलेली काळजी याविषयी माहिती दिली. शिवाजी महाराजांसाठी कशाचीही परवा न करता निर्भीडपणे खंबीरपणे महाराजांच्या पाठीशी उभे राहण्याची रयतेची मानसिकता आणि शत्रूशी लढण्याची वृत्ती याचे सोदाहरण उकल केली. शाहिस्तेखानाची फजिती कशी केली कसा हल्ला केला याची माहिती दिली. सुरतेची लूट याविषयी मांडणी करताना हल्ला कसा केला आणि कशी लूट केली हे सांगितले. त्याचबरोबर शिवाजी महाराजांनी आग्रा भेट प्रसंग सांगत असताना त्यांनी तिथे मिळालेली वागणूक त्यांना झालेली कैद शिवाजी महाराजांना बाल संभाजीची वाटणारी काळजी आणि यातून त्यांनी कशी सुटका करून घेतली व मोगल साम्राज्याला कसे चपराख दिली हे सांगितले तसेच शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य आणि जिंकलेले किल्ले याविषयी सविस्तर आणि सोदाहरण मांडणी केली. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा कसा पार पडला हे सांगितले. राजमुद्रा कशी प्रेरणादायी आहे याची उकल केली. शिवाजी महाराजांच्या प्रेरणेमुळे मावळे आत्म बलिदान करण्यास पुढे येत होते तानाजी मालुसरे, शिवा काशीद, बाजीप्रभू देशपांडे यांनी स्वराज्यासाठी केलेले कार्य अतुलनीय व धाडसी अनमोल आणि उल्लेखनीय आहे. तरुणांनाही पुढे घालणारे शिवाजी महाराजांचे चरित्र आहे. तात्कालीन सत्ताधीशांच्या विरोधात स्वराज्य निर्माण केले. रयतेवर, स्त्रियावर होणारे अत्याचार याविषयी त्यांचे कार्य लक्षात घेतले पाहिजे थोडक्यात शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य पुढील सर्व काळासाठी प्रेरणादायी आहे. शिवाजी महाराजांचा गनिमी कावा आणि मोहिमा याची मांडणी केली शिवाजी महाराजांनी सर्व ठिकाणी आखलेल्या ज्या योजना आहेत ज्या पद्धतीने संकटाचा सामना केला तो नक्कीच विद्यार्थी आणि सर्वसामान्यासाठी प्रेरणादायी ठरावा असाच आहे याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डॉ. वर्षा कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थिनी, आपल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी, महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विविध क्षेत्रातील कर्मचारी, नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.